गुरुवार, ३० मार्च २०२३ तरुण भारत संवाद

# गरवारे महाविद्यालयाशी 'रवळनाथ'चा करार



**सांगली : कराराची प्रत एम. एल. चौगुले यांच्याकडे सुपूर्द करताना डॉ. आर. जी. कुलकर्णी, शेजारी प्रा. व्ही. के. मायदेव, संचालक डॉ. किरण पोतदार, शाखाधिकारी श्रेयस गाडवे यांच्यासह अन्य मान्यवर.**

**प्रतिनिधी**
गडहिंग्लज

येथील रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटी आणि सांगली येथील श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. सांगली येथील गरवारे कन्या महाविद्यालयात झालेल्या बैठकीत रवळनाथचे अध्यक्ष एम. एल. चौगुले, सांगली शाखेचे सल्लागार, प्राचार्य डॉ. आर. जी. कुलकर्णी यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी बोलताना श्री. चौगुले म्हणाले, शिवाजी विद्यापीठासह जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयाशी रवळनाथ संस्थेची सामंजस्य करार केला. या करारामुळे विविध शैक्षणिक उपक्रम राबविणे शक्य होईल. लवकरच 'नवे शैक्षणिक धोरण' या विषयावर चर्चासत्र घेण्याचे यावेळी जाहीर केले. रवळनाथच्या सांगली शाखेला ही ठेवीदार, कर्जदार, ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळाल आहे. दोन महिन्यात १ कोटीची ठेव ठेवून सांगलीकरांनी रवळनाथवरील विश्वास वाढविल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव, संचालक डॉ. किरण पोतदार, शाखाधिकारी श्रेयस गाडवे, डॉ. व्ही. एस. गायकवाड, प्रा. आर. जी. देशपांडे, डॉ. व्ही. एस. होनमोरे, डॉ. यु. एन. क्षीरसागर, डॉ. एस. एम. दळवी, प्रा. आर. व्ही. पाटील, प्रा. डी. एस. देशपांडे यांच्यासह अन्य उपस्थित होते.